RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ११, अंक १८८(२)] बुधवार, डिसेंबर ३१, २०२५/पौष १०, शके १९४७ [पृष्ठे ८, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ४७९**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### नगरविकास विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ डिसेंबर, २०२५.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम, १९५८.**

क्रमांक एमआरडी-३३२५/प्र.क्र.१९५/नवि-७.— महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ (१९५८ चा मुंबई ६५) याच्या कलम २० ची पोट-कलम (१-अ), (१-ब), (१-क), (१-ड) आणि (१-इ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याला समर्थनीय करणाऱ्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे घोषित करते की, अटल बिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा अटल महामार्गाच्या भागातून व त्याचे पोच रस्ते यांचा वापर करणाऱ्या खालील अनुसूची १ मधील रकाना(२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रकारच्या मोटर वाहनांवर आणि वाहनांकडून ओढून नेल्या जाणाऱ्या अनुयानांवर वाहन प्रकार निहाय खालील अनुसूची १ मधील रकाना (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने **दिनांक १ जानेवारी २०२६ पासून दिनांक ३१ जानेवारी २०२६** या कालावधीसाठी खालील अनुसूची २ मधील रकाना (२) मध्ये नमूद पथकर आकारण्यात येत आहे :—

**अनुसूची-१**

**(अ) शिवडी ते गव्हाण या दरम्यान**

| अ.क्र. (१) | वाहनांचे प्रकार (२) | प्रति फेरीप्रमाणे पथकराचे दर (रुपयांमध्ये) (३) |
|---|---|---|
| | **दिनांक १ जानेवारी २०२६ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीकरिता** | |
| १ | “मोटर” अथवा “जीप” अथवा “व्हॅन” अथवा “हलके मोटार वाहन (एल एम.व्ही)” | २५० |
| २ | “हलके व्यावसायिक वाहन” अथवा हलके मालवाहू वाहन” अथवा “मिनी बस” | ४०० |
| ३ | “ट्रक” अथवा “बस” (दोन आसांचे) | ८३० |

| अ.क्र. (१) | वाहनांचे प्रकार (२) | प्रति फेरीप्रमाणे पथकराचे दर (रुपयांमध्ये) (३) |
|---|---|---|
| ४ | "तीन आसांचे व्यावसायिक वाहन" | ९०५ |
| ५ | "अवजड बांधकाम यंत्रसामग्री (एच.सी.एम)" अथवा "जमीन खोदाई यंत्रसामग्री (ई.एम.ई)" अथवा "अधिक आसांचे वाहन (एम.ए.व्ही)" (चार ते सहा आस) | १३०० |
| ६ | "अति अवजड वाहन" अथवा "अधिक आसांचे वाहन(एम.ए.व्ही)" (सात अथवा त्यापेक्षा जास्त आस) | १५०० |

**(ब) शिवडी ते शिवाजीनगर या दरम्यान**

| अ.क्र. (१) | वाहनांचे प्रकार (२) | प्रति फेरीप्रमाणे पथकराचे दर (रुपयांमध्ये) (३) |
|---|---|---|
| | **दिनांक १ जानेवारी २०२६ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीकरिता** | |
| १ | "मोटर" अथवा "जीप" अथवा "व्हॅन" अथवा "हलके मोटार वाहन (एल.एम.व्ही)" | २०० |
| २ | "हलके व्यावसायिक वाहन" अथवा हलके मालवाहू वाहन" अथवा "मिनी बस" | ३२० |
| ३ | "ट्रक" अथवा "बस" (दोन आसांचे) | ६५५ |
| ४ | "तीन आसांचे व्यावसायिक वाहन" | ७१५ |
| ५ | "अवजड बांधकाम यंत्रसामग्री (एच.सी.एम)" अथवा "जमीन खोदाई यंत्रसामग्री (ई.एम.ई)" अथवा "अधिक आसांचे वाहन (एम.ए.व्ही)" (चार ते सहा आस) | १०३० |
| ६ | "अति अवजड वाहन" अथवा "अधिक आसांचे वाहन(एम.ए.व्ही)" (सात अथवा त्यापेक्षा जास्त आस) | १२५५ |

**(क) शिवाजीनगर ते गव्हाण या दरम्यान**

| अ.क्र. (१) | वाहनांचे प्रकार (२) | प्रति फेरीप्रमाणे पथकराचे दर (रुपयांमध्ये) (३) |
|---|---|---|
| | **दिनांक १ जानेवारी २०२६ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीकरिता** | |
| १ | "मोटर" अथवा "जीप" अथवा "व्हॅन" अथवा "हलके मोटार वाहन (एल.एम.व्ही)" | ५० |
| २ | "हलके व्यावसायिक वाहन" अथवा हलके मालवाहू वाहन" अथवा "मिनी बस" | ८० |
| ३ | "ट्रक" अथवा "बस" (दोन आसांचे) | १७० |
| ४ | "तीन आसांचे व्यावसायिक वाहन" | १८५ |
| ५ | "अवजड बांधकाम यंत्रसामग्री (एच.सी.एम)" अथवा "जमीन खोदाई यंत्रसामग्री (ई.एम.ई)" अथवा "अधिक आसांचे वाहन (एम.ए.व्ही)" (चार ते सहा आस) | २७० |
| ६ | "अति अवजड वाहन" अथवा "अधिक आसांचे वाहन(एम.ए.व्ही)" (सात अथवा त्यापेक्षा जास्त आस) | ३२५ |

**अनुसूची २**

| अ.क्र. (१) | पथकर नाक्याचे नाव (२) | पथकर नाक्याचे (चेनेज) ठिकाण (३) |
|---|---|---|
| १ | शिवाजीनगर | १७+५०० |
| २ | गव्हाण | १९+४१७ |

**स्पष्टीकरण :—**

(अ) " मोटार " अथवा " जीप " अथवा " व्हॅन " अथवा " हलके मोटार वाहन " म्हणजे कोणतेही यांत्रिक वाहन ज्याचे एकूण वजन सात हजार पाचशे कि.ग्रॅ. पेक्षा जास्त नसेल अथवा मोटार वाहन अधिनियम, १९८८ अन्वये देण्यात आलेल्या प्रमाणपत्रामध्ये निर्धारित केलेली नोंदणीकृत प्रवासी क्षमता चालक वगळता बारा पेक्षा जास्त नसेल.

(ब) " हलके व्यावसायिक वाहन " अथवा " हलके मालवाहू वाहन " अथवा " मिनी बस " म्हणजे कोणतेही यांत्रिक वाहन ज्याचे एकूण वजन सात हजार पाचशे कि.ग्रॅ. किंवा त्यापेक्षा जास्त परंतु बारा हजार कि. ग्रॅ. पेक्षा कमी असेल अथवा मोटार वाहन अधिनियम, १९८८ अन्वये देण्यात आलेल्या प्रमाणपत्रामध्ये निर्धारित केलेली नोंदणीकृत प्रवासी क्षमता चालक वगळून बारापेक्षा जास्त परंतु बत्तीसपेक्षा जास्त नसेल.

(क) " ट्रक " अथवा "बस " म्हणजे कोणतेही यांत्रिक वाहन ज्याचे एकूण वजन बारा हजार कि. ग्रॅ. पेक्षा जास्त परंतु वीस हजार कि. ग्रॅ. पेक्षा कमी असेल अथवा मोटार वाहन अधिनियम, १९८८ अन्वये देण्यात आलेल्या प्रमाणपत्रामध्ये निर्धारित केलेली नोंदणीकृत प्रवासी क्षमता चालक वगळून बत्तीस पेक्षा जास्त असेल.

(ड) " तीन आसांचे वाहन " म्हणजे कोणतेही यांत्रिकी वाहन ज्यास तीन आस (ट्रेलर असल्यास अशा ट्रेलरच्या आसासह) असतील व ज्याचे एकूण वजन पंचवीस हजार कि.ग्रॅ. अथवा त्यापेक्षा कमी असेल.

(इ) " अवजड बांधकाम यंत्रसामग्री " अथवा " जमीन खोदाई यंत्रसामग्री " अथवा "अधिक आसांचे वाहन " म्हणजे अवजड बांधकाम यंत्रसामग्री अथवा जमीन खोदाई यंत्रसामग्री अथवा चार ते सहा आसांचे वाहन अथवा असे वाहन (ट्रेलर असल्यास अशा ट्रेलरच्या आसासह) ज्याचे एकूण वजन पंचवीस हजार कि.ग्रॅ. पेक्षा जास्त परंतु साठ हजार कि. ग्रॅ. पेक्षा कमी असेल.

(फ) " अति अवजड वाहन " म्हणजे कोणतेही यांत्रिक वाहन ज्यास सात अथवा अधिक आस असतील अथवा ज्याचे एकूण वजन साठ हजार कि.ग्रॅ. किंवा त्यापेक्षा जास्त असेल.

**टिप्पणी :—**

१. खालील प्रकारच्या वाहनांना पथकरातून सूट देण्यात येईल-

(अ)अतिमहत्त्वाचे व्यक्तीचे वाहन आणि सोबतची वाहने-

(i) भारताचे राष्ट्रपती;

(ii) भारताचे उप राष्ट्रपती;

(iii) भारताचे पंतप्रधान;

(iv) भारताचे मुख्य न्यायाधीश;

(v) राज्यपाल;

(vi) उप राज्यपाल;

(vii) केंद्रिय मंत्री;

(viii) मुख्यमंत्री;

(ix) सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश;

(x) लोकसभेचे सभापती;

(xi) राज्याच्या विधानपरिषदेचे सभापती;

(xii) राज्याच्या विधानसभेचे अध्यक्ष;

(xiii) उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश;

(xiv) उच्च न्यायालयाचे न्यायाधीश;

(xv) राज्य मंत्रीमंडळातील मंत्री;

(xvi) राज्य दौऱ्यावरील परदेशी मान्यवर;

(xvii) लोकसभा व राज्यसभेचे विद्यमान सदस्य, तसेच महाराष्ट्र विधानपरिषद व विधानसभेचे विद्यमान सदस्य ज्या वाहनातून प्रवास करत असतील अशी वाहने ;

(xviii) महाराष्ट्रातील माजी संसद सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषदेचे माजी सदस्य आणि महाराष्ट्र विधानसभेचे माजी सदस्य ;

(ब) कार्यालयीन कामकाजाकरिता वापरण्यात येणारी खालील वाहने :—

(i) भारतीय लष्कर ;

(ii) केंद्र आणि राज्य सशस्त्र सेना दलाची निमलष्करी दलासह गणवेश परिधान केलेले आणि पोलीस विभागाचा गणवेश परीधान केलेले;

(iii) अग्निशमन दल;

(iv) टपाल विभाग;

(v) अटल बिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा अटल सेतूचे निरीक्षण, देखभाल-दुरुस्ती व नियंत्रण करणारी वाहने;

(क) रुग्णवाहिका व शववाहिका ;

(ड) इलेक्ट्रिक चारचाकी वाहने ( परिवहन व परिवहनेत्तर वाहने) (M१), इलेक्ट्रिक बसेस (M३, M४) (राज्य परिवहन उपक्रम - STU), इलेक्ट्रिक बसेस (M३, M४) (खाजगी, राज्य / शहरी परिवहन उपक्रम)

२. पथकराच्या दरामध्ये खालीलप्रमाणे सवलती देण्यात येतील :—

(अ) वारंवार प्रवास करणाऱ्या वाहनांसाठी परतीच्या पासाचे व दैनिक पासाचे दर हे त्या वाहनाच्या एकेरी पथकराच्या दराच्या अनुक्रमे दीडपट व अडीचपट असतील. परतीचा व दैनिक पास ज्या दिनांकास देण्यात आला असेल, त्या दिवशीच्या रात्री १२.०० वाजेपर्यंत वैध राहील.

(ब) मासिक पासाचे दर एकेरी प्रवास दराच्या ५० पट राहतील.

३. अटल बिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा अटल सेतूवर बैलगाडी अथवा पशूद्वारे ओढून नेली जाणारी वाहने, दोन चाकी, तीन चाकी वाहने, तसेच सहा आसनी ऑटोरिक्षा, ट्रॅक्टर यांना प्रवेश करण्यास मनाई राहील.

४. या अधिसूचनेच्या प्रयोजनाकरिता अटल बिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा अटल सेतूवर उपरोल्लेखीत पथकर नाक्यांवर वरील अनुसूची-१,२ व ३ मध्ये नमूद कालावधीकरिता पथकराची संपूर्ण रक्कम वसूल करण्याचे आणि ठेवून घेण्याचे अधिकार "मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण" यांना प्रदान करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विजय चौधरी,**
शासनाचे सह सचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated 31st December, 2025.

*NOTIFICATION*

Maharashtra Motor Vehicle Tax Act, 1958.

No. MRD-3325/CR195/UD-7.– In exercise of the powers conferred by sub-sections (*1-A*), (*1-B*), (*1-C*), (*1-D*) and (*1-E*) of section 20 of the Maharashtra Motor Vehicle Tax Act (LXV of 1958), and of all the powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby declares that, the toll shall be levied on the classes of motor vehicles specified in column (2) of the *Schedule-I* mentioned below and on the trailers drawn by such motor vehicles, passing over the section Atal Bihari Vajpayee Sewri-Nhava Sheva Atal Setu and also approach roads thereto, at the rates specified against each of the said vehicles in column (*3*) of the said *Schedule-I*, with effect from the **1st January, 2026 to the 31st January 2026** at toll collection specified in column (*2*) of the *Schedule II* mentioned below constructed at the Chainage Nos. specified against each of the said toll collection centres specified in the column (*2*) of the *Schedule II* on the said section of the said road.

*Schedule-I*

**(A) Between Sewri and Gavan**

| **Sr. No.**<br>**(1)** | **Particulars of motor vehicles**<br>**(2)** | **Rates of toll per trip (In rupees)**<br>**(3)** |
|---|---|---|
| **For the period from 1st January 2026 to 31st January 2026** | | |
| 1 | Car, Jeep, Van or Light Motor Vehicles (LMV) | 250 |
| 2 | Light commercial vehicles, Light Goods Vehicles or Mini Bus | 400 |
| 3 | Bus or Truck (Two axels) | 830 |
| 4 | Three axle commercial vehicles | 905 |
| 5 | Heavy Construction Machinery (HCM) or Earth Moving Equipment (EME) or Multi axle vehicles (MAV) (four to six) | 1300 |
| 6 | Oversized Vehicles or Multi Axle vehicles (seven or more axles) | 1500 |

**(B) Between Sewri and Shivajinagar**

| **Sr. No.**<br>**(1)** | **Particulars of motor vehicles**<br>**(2)** | **Rates of toll per trip (In rupees)**<br>**(3)** |
|---|---|---|
| **For the period from 1st January 2026 to 31st January 2026** | | |
| 1 | Car, Jeep, Van or Light Motor Vehicles (LMV) | 200 |
| 2 | Light commercial vehicles, Light Goods Vehicles or Mini Bus | 320 |
| 3 | Bus or Truck (Two axels) | 655 |
| 4 | Three axle commercial vehicles | 715 |
| 5 | Heavy Construction Machinery (HCM) or Earth Moving Equipment (EME) or Multi axle vehicles (MAV) (four to six) | 1030 |
| 6 | Oversized Vehicles or Multi Axle vehicles (seven or more axles) | 1255 |

**(B) Between Sewri and Shivajinagar**

| Sr. No.<br>(1) | Particulars of motor vehicles<br>(2) | Rates of toll per trip (In rupees)<br>(3) |
|---|---|---|
| **For the period from 1st January 2026 to 31st January 2026** | | |
| 1 | Car, Jeep, Van or Light Motor Vehicles (LMV) | 50 |
| 2 | Light commercial vehicles, Light Goods Vehicles or Mini Bus | 80 |
| 3 | Bus or Truck (Two axels) | 170 |
| 4 | Three axle commercial vehicles | 185 |
| 5 | Heavy Construction Machinery (HCM) or Earth Moving Equipment (EME) or Multi axle vehicles (MAV) (four to six) | 270 |
| 6 | Oversized Vehicles or Multi Axle vehicles (seven or more axles) | 325 |

*Schedule-II*

| Serial No.<br>(1) | Name of Toll Collection Centres<br>(2) | Chainage Nos.<br>(3) |
|---|---|---|
| 1 | Shivaji Nagar | 17+500 |
| 2 | Gavan | 19+417 |

**Explanation :**

(a) "**Car**" or "**jeep**" or "**van**" or "**light motor vehicle**" means any mechanical vehicle the gross vehicle weight of which does not exceed seven thousand five hundred kilograms or the registered passenger carrying capability as specified in the certificate of registration issued under the Motor Vehicles Act, 1988 does not exceed twelve excluding the driver;

(b) "**Light commercial vehicle**" or "**light goods vehicle**" or "**mini bus**" means any mechanical vehicle with a gross vehicle weight equal to or exceeding seven thousand five hundred kilograms but less than twelve thousand kilograms or the registered passenger carrying capability as specified in the certificate of registration issued under the Motor Vehicles Act, 1988, exceeds twelve but does not exceed thirty-two excluding the driver;

(c) "**Truck**" or "**bus**" means any mechanical vehicle with a gross vehicle weight exceeding twelve thousand kilograms but less than twenty thousand kilograms or the registered passenger carrying capability as specified in the certificate of registration issued under the Motor Vehicles Act, 1988, exceeds thirty-two, excluding the driver;

(d) "**Three-axle vehicle**" means any mechanical vehicle with three-axles (inclusive of the axles of the trailers, if any) and with a gross vehicle weight, less than or equal to twenty-five thousand kilograms;

(e) "**Heavy construction machinery**" or "**earth moving equipment**" or "**multi axle vehicle**" means heavy construction machinery or earth moving equipment or mechanical vehicle including a multi axle vehicle with 4 to six axles or vehicle (inclusive of axles of the trailers, if any) with a gross vehicle weight exceeding twenty thousand kilograms but less than sixty thousand kilograms;

(f) "**Oversized vehicle**" means any mechanical vehicle having seven or more axles or vehicle with a gross vehicle weight equal to or exceeding sixty thousand kilograms.

*Notes* :—

The following types of vehicles are exempted from payment of toll, namely :—

(a) transporting and accompanying, -

(i) the President of India;

(ii) the Vice-President of India;

(iii) the Prime-Minister of India;

(iv) the Chief Justice of India;

(v) the Governor;

(vi) the Lieutenant Governor;

(vii) the Union Minister;

(viii) the Chief Minister;

(ix) the Judge of Supreme Court;

(x) the Chairman of the Council of State (Rajya Sabha);

(xi) the Speaker of the House of People (Lok Sabha);

(xii) the Chairman of the Legislative Council of the State;

(xiii) the Speaker of the Legislative Assembly of the State;

(xiv) the Chief Justice of High Court;

(xv) the Judge of High Court;

(xvi) Ministers of State Cabinet;

(xvii) Foreign dignitaries on State visit;

(xviii) Vehicle in which the sitting Member of Parliament, Maharashtra Legislative Assembly and Maharashtra Legislative Council are travelling;

(xix) Vehicles in which ex-Members of Parliament from Maharashtra, Maharashtra Legislative Assembly and Maharashtra Legislative Council are travelling;

(b) Vehicles used for official purpose by,-

(i) Defence Officials

(ii) The Central and State armed forces including paramilitary forces and Police Department officials;

(iii) Fire-fighting Department;

(iv) Department of Post;

(v) Officers inspecting and monitoring the Atal Bihari Vajpayee Sewri-Nhava Sheva Atal Setu;

(c)Ambulance and Hearses.

(d) e-4W cars (M1)(Transport and Non-Transport vehicle), e-buses (M3, M4)(STU), e-buses (M3, M4) (Non STU)

2. Concessions in rates of toll are as given below :—

(a) The rates of return journey pass and daily pass of the frequently plying vehicle shall be one and half times and two and half times of their respective one way travel rates. Return journey pass and daily pass shall be valid upto 12.00 midnight of the day of issuing the pass.

(b) The rates of monthly passes will be 50 times of their respective one way travel rates.

3. Non-propelled vehicles, animal drawn carts, two wheelers, three wheelers, six-seater auto rickshaw, tractors and any form of non-motorized traffic are not permitted on Atal Bihari Vajpayee Sewri-Nhava Sheva Atal Setu.

4. For the purpose of this Notification the "Mumbai Metropolitan Region Development Authority" is authorized to collect toll at the above mentioned toll collection Plazas on Atal Bihari Vajpayee Sewri-Nhava Sheva Atal Setu for above mentioned period in Schedule-I, II and III & retain the amount of the toll by authorized collector only.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VIJAY CHAUDHARI,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.